# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

**विभागीय कार्यालय**

517/ई, एम.ए.आय.डी.सी. बिल्डिंग, महाराणी ताराबाई चौक,

कावाळा नाका, कोल्हापूर-४१६००१.

**दूरध्वनी :-** ९८६०३४५००७, ९१५६८८६५००

**E Mail:** - kolhapur.ro@mswc.in. **WEBSITE:** - www.mswarehousing.com


## निविदा (Short Tender Notice)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे,मौजे मालगांव , मिरज,ता.मिरज,जि.सांगली ,येथे मिरज पासून 4 km अंतरावरील शीतगृह सुविधा एकूण 856 MT (प्रत्येकी 214 MT चे चार चेंबर्स) शीतगृह As is were is basis पद्धतीने Lock & Key तत्वावर आऊटसोर्सिंग पध्दतीने भाडे तत्वावर प्रती वर्षी 6% दरवाढीने किमान तीन वर्षे(1+2) कालावधी साठी देण्याचे नियोजन आहे.त्यासाठी शितगृह सुविधा भाडे तत्वावर घेणेबाबत शेतकरी ,व्यापारी,शेतकरी उत्पादक कंपनी,आयातदार -निर्यातदार इ. आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि शीतगृह चालविण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या इच्छुक निविदाकारांकडून लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे.सहा महिन्याचे साठवणूक भाडे विना व्याज सुरक्षा तारण ठेव रक्कम म्हणून महामंडळाकडे जमा करावी लागेल . अर्जासोबत सादर करायची फी-रु.10,000/- +GST आणि बयाणा रक्कम म्हणून रु.50,000/- या दोन्ही रकमा Demand Draft ने जमा करावी लागेल. प्रती चेंबर दर हा कमीम कमी **(Base Amount) रू. 35000/-** असून त्यावरील दराचे दरपत्रेक/ निविदा मान्य करण्यात येईल.

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय ,कोल्हापूर विभाग यांच्या वरील पत्यावरील कार्यालयात दि 09/06/2025 ते 27/06/2025 या कालावधीत सायंकाळी 5 वाजेपर्यंत.(सुट्टीचे दिवस सोडून)पोहोच होतील अश्या बेताने पाठवाव्यात किंवा स्वतः प्रत्यक्ष पोहच कराव्यात.प्राप्त निविदा/दरपत्रके विभागीय कार्यालय कोल्हापूर विभाग यांच्या कार्यालयात दि. 30/06/2025 रोजी दुपारी २.०० वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर केलेल्या तारखेला उघडण्यात येतील. इच्छुक निविदाकार विभागीय कार्यालय कोल्हापूर येथे उपस्थित राहू शकतील.

सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत मागील तीन वर्षांचा Audited Report आणि IT return तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र शितगृह चालविण्या बाबतचे किमान तीन वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र इ.आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.

- निविदेमधील अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता ,निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे,मौजे मालगांव , मिरज,ता.मिरज,जि.सांगली ,येथील शीतगृह सुविधा एकूण ८५६ MT (प्रत्येकी २१४ MT चे चार चेंबर्स)शीतगृह As is were is basis पद्धतीने Lock & Key तत्वायर आऊटसोर्सिंग पध्दतीने तीन वर्षे(१+२) कालावधी साठी देण्याचे नियोजन आहे.त्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com संकेतस्थळावर पाहत येतील .

१. अर्जाची छाननी व दरांची तुलना केल्यानंतर तांत्रिक आणि उच्चतम दर प्राप्त अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात येईल.

२. अर्जदाराने एकूण चारही चेंबर्स करीता दर नमूद करणे आवश्यक आहे. चारपेक्षा कमी चेंबर्स करीता दर नमूद केल्यास अर्ज स्विकारली जाणार नाही. महत्तम प्राप्त होणाऱ्या दराच्या निविदा/दरपत्रके विचारात घेतले जातील.

३. प्रत्यक्ष ताबा दिल्याच्या दिनांकापासून पुढील ३६ महिने कालावधीकरीता मिरज येथील शितगृहामधील एकूण ४ चेंबर्स लॉक अँण्ड की तत्वावर भाड्याने देण्याचा निर्णय घेण्यात येईल.

४. यशस्वी अर्जदार/निविदाकार यांचा आरक्षण/ भाडे कालावधी(1+2) संपुष्टात आल्यानंतर, त्यांचा मूळ कालावधीतील व्यवसाय संबंधांचा आढावा घेवून ६ + ६ महिने मुदतवाढ देणेबाबत अंतिम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा राहील.

५. आरक्षण/भाडे कालावधी ३६ महिने असून त्यामधील १२ महिने लॉक इन कालावधी असणार आहे. लॉक इन कालावधी मध्ये आरक्षण रद्द करता येणार नाही. तसेच दरवर्षी ६% प्रमाणे भाडे दरवाढ देणे बंधनकारक राहील.

६. आरक्षण रद्द करणेसाठी लॉक इन कालावधीनंतर किमान ९० दिवसांची पूर्व नोटीस देणे बंधनकारक राहील.

७. मिरज येथील शितगृहामधील चेंबर्स लॉक अँण्ड की भाडे तत्वावर दिल्यानंतर यशस्वी निविदाकाराने तेथे ४°C ते १२°C या तापमानामध्ये साठवणूक योग्य फक्त कृषी उत्पादने प्राधान्याने साठवणूक करणे बंधनकारक राहील. (उदा. फळे, भाजीपाला, कडधान्ये, मिरची, सुकामेवा, इत्यादी)

८. मिरज येथील शितगृहामधील चेंबर्स लॉक अँण्ड की वर दिल्यानंतर यशस्वी अर्जदाराने प्रत्येक महिन्याचे गोदाम भाडे व GST रक्कम अग्रीम स्वरूपात (महिन्याच्या पहिल्या सप्ताहामध्ये) RTGS/NEFT द्वारे महामंडळाच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील. विलंबाने भाडे जमा केल्यास प्रत्येक ३० दिवसांपर्यंत (प्रति मासिक) २% प्रमाणे विलंब दंड आकारणी करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाराकाराने साठवणुकीतील मालाचा विमा उतरविणे व त्याची प्रत महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील. इमारत व मशिनरी यांचा विमा महामंडळाकडून उतरविण्यात येईल.

१०. साठवणूकीतील मालाचा विमा न उतरवल्यास भाडे करार रद्द करण्याचा अधिकार महामंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे. तसेच साठवणूकीतील मालाचे नुकसान झाल्यास व त्याचा विमा नसल्यास त्या नुकसानी पोटी महामंडळाकडून कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

११. सदर लॉक अँण्ड की तत्वाच्या आरक्षणापोटी/भाडे तत्वापोटी निविदाकाराने सादर केलेल्या दराप्रमाणे सहा महिन्याचे भाडे एवढी समतुल्य रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रकमेपोटी मिरज वखार केंद्रावर जमा करणे बंधनकारक राहील. सुरक्षा तारण ठेव रक्कम जमा केल्यानंतरच चेंबर्सचा ताबा देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१२. सुरक्षा तारण ठेव रक्कम उद्देशिय पत्राच्या दिनांकापासून ८ दिवसांत जमा न केल्यास,निविदा/दरपत्रक रद्द करण्यात येवून, बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१३. लॉक अँण्ड की तत्तवावर दिलेल्या चेंबरचा ताबा कार्यदेशाच्या दिनांकापासून ३ दिवसात न घेतल्यास निविदा/दरपत्र रद्द ठरवण्यात येवून बयाना रक्कम जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल.

१४. शितगृहामधील चेंबरमध्ये थंड वातावरणातील हाताळणी (उत्तराई-चढाई इत्यादी) याची जबाबदारी यशस्वी निविदाकार/दरपत्रकदार यांची राहील. तसेच हाताळणीचे पर्यवेक्षण यशस्वी निविदाकार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या निगरानी खाली करण्यात येईल त्याची जबाबदारी महामंडळाची राहणार नाही.

१५. शितगृहाच्या चेंबरमध्ये साठवणूकीसाठी आवश्यक साहित्य (डनेज, क्रेट, पॅलेट इत्यादी) यशस्वी अर्जदाराने स्वखच करणे आवश्यक राहील. सदर साहित्य अथवा त्यापोटी येणार खर्च महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१६. शितगृहाचा मशिनरी ऑपरेट करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील. तसेच त्यापोटी येणारे विज देयक अदा करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील.

१७. सदर आरक्षित जागेतील साठवणूकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे यशस्वी अर्जदाराचा तोटा झाल्यास त्या महामंडळ जबाबदार राहणार नाही. तसेच त्या सबबी खाली भाडे नाकारता / थकविता येणार नाही.

१८. सदर आरक्षित जागेत नाशवंत शेतमाल साठवणूकी मुळे मिरज वखार केंद्रावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकार यांची राहिल. तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची यशस्वी अर्जदाराकाने काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

१९. यशस्वी निविदाकार यांनी महामंडळाशी विहित नमुन्यात आरक्षण/भाडे कालावधीचा साठवणूक करारनामा नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२०. करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक बाबींचा सर्व खर्च यशस्वी निविदाकार यांना करावा लागेल.

२१.निविदाकार यांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर अर्जदारचा महामंडळाकडे जमा केलेली बयाणा रक्कम रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच सदर अर्जदारकास पुढील ३ वर्षे कालावधीसाठी महामंडळाकडून काळया यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

**अर्जाचा नमुना :**

## विनंती अर्ज

१. अर्जदार निविदाकाराचे नाव :

२. कार्यालयाचा पत्ता :

३. जीएसटी क्रमांक :

४. पॅन क्रमांक :

५. ई-मेल:

६. फोन नंबर :

७. संपर्कासाठीच्या व्यक्तीचे नाव व मोबाईल नंबर :

८. इतर माहिती :

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

१. मुंबई प्रांतिक दुकाने व आस्थापना परवानाची छायांकीत प्रत

२. कंपनी नोंदणी प्रमाणपत्र

३. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

४. पॅन नोंदणी प्रमाणपत्र /तीन वर्षाचे IT Return

५. शीतगृह चालविण्याचे कमीत कमी तीन वर्ष अनुभवाचे प्रमाणपत्र

६. निविदाकारास कोणत्याही शासकीय / निमशासकीय आस्थापनेकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नाही याबाबतचे लेटरहेडवर स्वयंघोषणापत्र (रू. ५०० च्या स्टॅम्प पेपर वर सादर करण्यात यावे.)

******

Scanned with OKEN Scanner